Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 322-330

DOI: 10.5281/zenodo.10125710

Original Research Article

# महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची समर्पकता

प्रा. डॉ. एस. एच. कडेकर

सहाय्यक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ उपपरिसर, लातूर ४१३५३१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: shkadekar@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**गोषवारा**

राष्ट्रपिता महात्मा गांधी हे एक जागतिक ख्यातीचे बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांनी स्वतःचे आयुष्य हे मनुष्य सेवा व राष्ट्र सेवा यासाठी समर्पित केल्याचे दिसून येते. गांधीजींचा जन्म भारतात झालेला असल्यामुळे या भारतभूमीची सेवा करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे असे त्यांचे मत होते. गांधीजींनी आपले विचार, कृती, चळवळी, संस्थांची निर्मिती आणि स्वतःची जीवनशैली या माध्यमातून राष्ट्र सेवेचे कार्य केले. त्यांचे जीवन हेच जगासाठी मोठा संदेश आहे. त्यांच्या विविधांगी सृजनशील कार्यांमध्ये प्रामुख्याने राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित कार्यांचा समावेश होतो.

समाजाच्या आर्थिक कल्याणासाठी गांधीजींनी अनेक प्रकारचे कार्य केले. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती आणि राष्ट्रासाठी स्वयंपूर्णता ही आवश्यक बाब असते. या भूमिकेतूनच गांधीजींनी देशातील अनेक आर्थिक समस्यांचा अभ्यास केला आणि त्या समस्या सोडवण्यासाठी कृती-आराखडा तयार केला. यातच गांधीजींच्या आर्थिक विचारांचे मूळ सापडते. मानवी जीवनाचा बहुतांश भाग हा आर्थिक क्रियांमध्येच व्यस्त असतो याची जाणीव गांधीजींना होती. परंतु याबाबतीत नीतिमत्ता आणि अहिंसा या तत्त्वांना सोडून कोणतीही आर्थिक क्रिया असू नये अशी गांधीजींची धारणा होती.

गांधीजींच्या विचारांवर रस्किन यांच्या 'Unto the Last' या ग्रंथाचा प्रभाव होता. त्याची प्रचिती आपल्याला गांधीवादी अर्थशास्त्रात येते. गांधीजींनी स्वतः अर्थतज्ञ असल्याचा कधीही दावा केला नाही किंवा ते अर्थशास्त्राचे विद्यार्थीही नव्हते. परंतु त्यांनी अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या ठरतील अशा अनेक व्यावहारिक संकल्पना मांडल्या

तेच पुढे गांधीजींचे आर्थिक विचार म्हणून अभ्यासले जाऊ लागले. त्याआधारे बरेच साहित्य निर्माण झाले, त्याला आधुनिक काळात 'गांधीवादी अर्थशास्त्र' असे संबोधले जाते.

**प्रमुख शब्द:** महात्मा गांधींचे आर्थिक विचार, स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था, स्वदेशी, उत्पादन, विकेंद्रीकरण, यंत्र व यांत्रिकीकरण, सर्वोदय, विश्वस्थाची संकल्पना, श्रमप्रतिष्ठा.

**प्रस्तावना**

'माझे जीवन हाच माझा संदेश आहे' ('My Life is my Message') असे म्हणणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी जे विचार मांडले त्यात अनेक विद्याशाखांची संबंधित विचारांचा समावेश आहे. गांधीजींच्या आर्थिक विचारांवर नैतिक धारणांचा पगडा होता. त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था आणि साधे जीवन यावर भर दिला व याचा संबंध त्यांनी सार्वत्रिक कल्याणाची जोडला, यातूनच गांधीजींच्या आर्थिक विचारांची पायाभरणी झाली. गांधीजींचे आर्थिक प्रतिमान हे मुख्यत: भारतीय आर्थिक समस्यांचे निरसन करण्याच्या समजुतीवर आधारित होते. सदर प्रतिमान आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील राबविले जाऊ शकते, असा त्यांना विश्वास होता. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, महात्मा गांधींच्या आर्थिक विचार प्रणालीला एक मानवतावादी चेहरा होता. त्यांच्या मतानुसार कोणतेही आर्थिक प्रतिमान हे अमलात आणण्यासाठी तोपर्यंत पात्र होत नाही जोपर्यंत ते समस्त मानवजातीच्या हिताच्या उद्देशांनी प्रेरित नसते.

आर्थिक दृष्टिकोनातून गांधीजींनी अनेक व्यावहारिक संकल्पना मांडल्या. त्यातून त्यांचे आर्थिक विचार स्पष्ट होतात. महात्मा गांधींचे आर्थिक विचार प्रत्येक व्यक्तीला समान आर्थिक संधी व न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था, उत्पादन, खादी व ग्रामीण कुटीर उद्योग, आर्थिक सत्ता वनसंपत्तीचे विकेंद्रीकरण, योग्य तंत्रज्ञान, गरजांची पूर्तता, स्वदेशी, विश्वस्थाची संकल्पना, सर्वोदय, आर्थिक विकास आणि अभिवृद्धी तसेच अर्थव्यवस्थेचे स्वरूप आणि राज्याची भूमिका याबाबतीत गांधीजींनी मांडलेल्या विचारांचा समावेश होतो. गांधीजींचे आर्थिक विचार हे त्यांच्या स्वतःच्या लेखनातून किंवा इतरांनी त्यांच्याबाबत लिहिलेल्या ग्रंथ व संशोधनपर लेखांमधून प्रकट होतात. महात्मा गांधींच्या आर्थिक विचारात साधेपणा, स्वयंपूर्णता, स्वावलंबन, विकेंद्रीकरण, सहकार, समानता, अहिंसा, मानवी मूल्य इत्यादी बाबींवर भर देण्यात आलेला आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्नांची सोडवणूक ही गांधी विचारांच्या साह्याने करता येऊ शकते, असे मत गुनार मिर्डल या अर्थतज्ज्ञाने मांडले आहे. या संशोधनपर लेखात गांधीजींचे आर्थिक विचार व त्यांची सद्यकालीन समर्पकता याचे विवेचन करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे.

२. महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांच्या समर्पकतेचे विवेचन करणे.

**संशोधन पद्धती**

सदरील संशोधनपर लेखामध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. आवश्यक माहितीचे संकलन हे महात्मा गांधीच्या कार्यावरील विविध ग्रंथ, संशोधनपर लेख यातून करण्यात आले आहे. उपलब्ध माहितीच्या आधारे महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा आढावा घेऊन त्या विचारांची समर्पकता याचे विवेचन करण्यात आले आहे.

**महात्मा गांधींचे आर्थिक विचार व त्या विचारांची समर्पकता**

महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची समर्पकता पुढील मुद्द्यांच्या साह्याने पाहता येईल.

**१. स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था**

बहुसंख्य भारत देश हा खेड्यातच वसलेला असल्यामुळे स्वाभाविकपणे देशाचा विकास हा ग्रामीण विकासावर अवलंबून आहे. म्हणूनच गांधीजींनी 'ग्राम स्वराज्य' ही संकल्पना मांडून ग्रामीण विकासाकरिता उद्योगाच्या वृद्धी व विकासावर भर दिला. त्यामध्ये खादी उद्योग, हातमाग, रेशीम उद्योग, हस्तकला उद्योग इत्यादी ग्रामीण उद्योग हे कुटुंबातील श्रमावर आधारित असून त्यांना किमान भांडवलाची गरज असते. अशा उद्योगांना लागणारा कच्चा माल हा स्थानिक परिसरात उपलब्ध असतो. तसेच अशा उद्योगात तयार होणाऱ्या वस्तू ह्या स्थानिक बाजारपेठेतच विकल्या जातात त्यामुळे उत्पादन आणि विपणनासंबंधित समस्याच उद्भवत नाहीत.

गांधीजींनी ग्रामीण भागात कुटीर उद्योगांच्या विकासावर भर दिला, ज्यायोगे कृषीवरील भार कमी होईल असे त्यांचे मत होते. कुटीर उद्योगातून ग्रामीण लोकांना रोजगाराचे साधन निर्माण होईल. ज्यामुळे शहरांकडे होणारे त्यांचे स्थलांतरण रोखले जाईल. कुटीर उद्योगातून ग्रामीण तसेच शहरी लोकांच्याही गरजा भागवल्या जातील व शिल्लक उत्पादनाची निर्यात करता येईल, असे गांधीजींना वाटत असे. प्रत्येक ग्राम हे स्वयंपूर्ण असले पाहिजे. जर प्रत्येक खेड्याने आपले अधिक उत्पादन हे गरीब खेड्यांमध्ये वितरीत केले तर दारिद्र्य आणि उपासमारीची समस्या निर्माण होणार नाही. यातून दारिद्र्य निर्मूलन होईल व लोक हे आनंदी आणि स्वावलंबी बनतील.

गांधीजींनी भारतीय नागरिकांना ग्रामीण उद्योगातील उत्पादने वापरण्याचे आव्हान केले होते. प्रत्येकांनी खेड्यात तयार झालेल्या वस्तू जेव्हा केव्हा उपलब्ध असतील तेव्हा त्या वापरणे हे बहुमानाचे समजले पाहिजे. आपल्या बहुतांश गरजांची पूर्तता ग्रामीण वस्तूंद्वारे होऊ शकते. ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित झाल्यास एक तर स्थानिक लोकांना महत्तम रोजगार व उत्पन्न प्राप्त होईल. दुसरे म्हणजे यातून समानता, स्वातंत्र्य व न्याय प्रस्थापित होईल असे गांधीजींचे मत होते.

गांधीजींच्या मते, आपण खेड्यांना स्वयंपूर्ण, मुख्यतः वापरासाठी वस्तूंची निर्मिती करण्यास सक्षम बनविण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. ("We have to concentrate on the villages being self-contained, manufacturing mainly for use…")

सध्या ग्रामीण क्षेत्राची स्थिती पाहता महात्मा गांधींचे आर्थिक प्रतिमान हे अधिक उपयुक्त ठरू शकते, असे वाटते. कारण आज खेड्यांमध्ये कोणत्याही प्रकारची स्वयंपूर्णता राहिलेली नाही. ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीप्रधान असून काही जोड व्यवसायावर चालते. परंतु यातून पुरेसा रोजगार निर्माण होत नसल्याने अनेक लोक शहरांकडे स्थलांतर करतात त्यामुळे खेडी ओस पडत आहेत. तसेच शहरातही स्थलांतरित लोकांना चांगला रोजगार किंवा उपजीविकेचे साधन सहजासहजी उपलब्ध होताना दिसत नाही. यावरून गांधीजींच्या स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेची समर्पकता लक्षात येते.

**२. उत्पादन**

गांधीजींच्या मते, उत्पादन व्यवस्थेचे स्थूल स्वरूप हे साधे असले पाहिजे. जसे की, तयार झालेले उत्पादन हे प्रथमतः वापरासाठी असून ते विनिमयासाठी नाही, अशी उत्पादन प्रक्रियेने खात्री दिली पाहिजे. तसेच संसाधनांचा वापर देखील अशा पद्धतीने झाला पाहिजे की, परावलंबी अर्थव्यवस्था ही सेवा प्रधान अर्थव्यवस्थेकडे वळली पाहिजे. म्हणजेच उत्पादन हे शोषण आणि अहिंसा यापासून मुक्त असले पाहिजे. हानिकारक वस्तूंचे उत्पादन करण्यात येऊ नये. उत्पादन व्यवस्थेने प्राथमिक गरजा किंवा आवश्यकतांच्या बाबतीत स्वयंपूर्णतेची खात्री दिली पाहिजे. स्वयंपूर्णता ही कुटुंब, ग्राम व देशपातळीवर प्राप्त केली जाऊ शकते. उत्पादन पद्धती ही साधी व स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या संसाधनांवर आधारित असावी. तिच्याद्वारे उपलब्ध संसाधनांचा अपव्यय न होता त्यांचे संवर्धन झाले पाहिजे.

अलीकडील काळात विकसित झालेली उत्पादन व्यवस्था ही चंगळवादी स्वरूपाची आहे. ज्यामध्ये संसाधनांचा अपव्यय होतो तसेच पर्यावरणाला हानी पोहोचते व त्याचे दुष्परिणाम हे मानवालाच भोगावे लागत. मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊनही उपासमार, कुपोषणासारख्या समस्या अजूनही संपुष्टात आल्या नाहीत. यावरून गांधीजींचे उत्पादन विषयक विचार अधिक उपयुक्त व समर्पक वाटतात.

**३. विकेंद्रीकरण**

महात्मा गांधींनी नेहमीच संपत्ती व सत्ता यांच्या विकेंद्रीकरणाचा पाठपुरावा केला जेणेकरून हिंसा टाळता येईल. त्यांनी उत्पादन हे एखाद्या विशिष्ट स्थळी केंद्रीकृत न होऊ देता त्याचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे असे सुचविले होते. गांधीजींचा विकेंद्रीकरणाचा आराखडा हा मूलतः हा केंद्रीकृत अर्थव्यवस्थेचे दोष दूर करण्याच्या उद्देशाने प्रेरित होता. केंद्रीकृत उद्योग हे सर्वसाधारणपणे मोठे उद्योग असतात. गांधीजींच्या मते, अशा अवजड उद्योगांवर सरकारचे कठोर नियंत्रण असले पाहिजे. काही मूलभूत व महत्त्वाच्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे. काहीवेळा अवजड उद्योग हे निरुपयोगी ठरतात आणि ते सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यात सहाय्यक ठरत नसतात. यामुळेच गांधीजीनी ग्रामीण व कुटीर उद्योगांवर भर दिला होता.

सध्या देशात मोठ्या उद्योगांचे झालेले केंद्रीकरण अनेक समस्यांचे कारण बनले आहे. त्यातून प्रादेशिक असमानता, संपत्तीचे केंद्रीकरण, गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी, विशिष्ट भागातील नैसर्गिक संसाधनांची हानी, प्रदूषण, लोकसंख्येचे

स्थलांतरण अशा समस्या निर्माण होतात. यामुळे देशाच्या विकासातील समतोल बिघडत चालला आहे. गांधीजीच्या विकेंद्रीकरणाचे विचार अमलात आणले असते तर वरील समस्याच निर्माण झाल्या नसत्या हे समजून घेतले पाहिजे.

**४. यंत्र व यांत्रिकीकरण**

गांधीजी म्हणतात, "मी यंत्रांचा विरोध करीत नाही, पण मी अशा यंत्रसामुग्रीच्या विरोधात आहे जे श्रमाला विस्थापित करून त्यांना निष्क्रिय ठेवतात." (I am not opposed to machinery as such. I am opposed to machinery which displaces labour and leaves it idle"). यावरून हे स्पष्ट होते की,गांधीजी हे लोकांना निष्क्रिय आणि बेरोजगारीच्या समस्येत टाकणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या विरोधात होते. परंतु यांत्रिकीकरणाला त्यांनी तसे पूर्णतः नाकारले नव्हते. त्यांच्या मते, यंत्रांनी मनुष्याला मदत केली पाहिजे, त्याची उत्पादकता वाढवली पाहिजे, परंतु लोकांना बेरोजगार केले नाही पाहिजे. माणसांनी यंत्रांचा गुलाम न बनता त्यांना योग्य हाताळले पाहिजे. गांधीजींनी भारतासारख्या मुबलक श्रम पुरवठा असलेल्या व भांडवलाचा तुटवडा असलेल्या अर्थव्यवस्थेसाठी श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा आग्रह धरला होता, तो अतिशय न्याय्य होता. पुढे गांधीजींनी सकारात्मक पणे असे प्रतिपादन केले की, "मला असे वाटते की, संपत्ती ही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रीकृत न होता सर्वांच्या हातात राहिली पाहिजे. परंतु आज यंत्र हे केवळ मोजक्या लोकांना लाखो जनतेच्या पाठीवरून धावण्यास मदत करतात." या सबबीवरून गांधीजी हे श्रमप्रधान उत्पादन तंत्राचे आग्रही पुरस्कर्ते होते हे स्पष्ट होते.

तंत्रज्ञानाचा अधिक वापर व यांत्रिकीकरणामुळे आज देशातील तरुणांना रोजगार मिळत नाही तेव्हा योग्य तंत्रज्ञानावर आधारित मर्यादित यांत्रिकीकरणाचा महात्मा गांधींचा विचार अधिक समर्पक होता, असे म्हणता येईल.

**५. गरजांवर नियंत्रण**

गरजांवरील नियंत्रण याबाबत गांधीजींचे एक प्रसिद्ध वाक्य आहे ते म्हणजे, "निसर्ग सर्व लोकांच्या गरजा भागतील एवढे उत्पादित करतो, परंतु कोणत्याही व्यक्तीच्या लालसेचे समाधान होईल एवढे मात्र करू शकत नाही." ("Nature produces enough to meet the needs of all the people, but not enough to satisfy the greed of any man.")

प्रत्येकाच्या किमान गरजा भागण्यासाठी, गांधीजी दोन उपाय सुचवतात त्यापैकी एक म्हणजे, प्रत्येकाला पुरेसे काम मिळाले पाहिजे जे त्याला त्याच्या किमान गरजा भागवण्यासाठी सक्षम बनवेल. दुसरा म्हणजे, मूलभूत गरजांच्या उत्पादनाची साधने ही लोकांच्या नियंत्रणाखाली असली पाहिजे. गांधीजींचा गरजांच्या पूर्तीचा हा विचार लोककल्याणाचा आहे. लोकांचे जीवनमान हे त्यांच्या गरजांच्या पूर्ततेवरच अवलंबून असते यावरून गरजांची पूर्तता किती महत्वाची आहे हे सिद्ध होते.

**६. स्वदेशी**

महात्मा गांधींनी 'स्वदेशी' चा पुरस्कार केला होता. स्वदेशी ही केवळ वस्तू नाही तर तो एक विचार आहे असे गांधीजींचे मत होते. परदेशी लोक गांधीजींची ब्रिटिश वसाहतवाद विरोधीची स्वदेशी चळवळ जाणतात, तो त्यांच्या लढ्याचा एक छोटासा भाग होता. त्यांच्या या चळवळीचा मोठा भाग म्हणजे, भारताचे महात्म्य व संस्कृती याचे पुन:

निर्माण करणे हा होता. स्वदेशी तत्त्वानुसार जे काही खेड्यात तयार किंवा उत्पादित केले जाते, त्याचा वापर प्रथम आणि मुख्यतः ग्रामीण लोकांनी केला पाहिजे. व्यापार हा भिन्न खेड्यांमध्ये झाला पाहिजे, नगरांचे प्रमाण कमी राहिले पाहिजे, ज्या वस्तू व सेवा समुदायात तयार केल्या जाऊ शकत नाहीत त्या दुसरीकडून विकत घेतल्या जाऊ शकतात.

स्वदेशी ने बाजारावरील आर्थिक परावलंबित्व टाळले होते, कारण त्यामुळे ग्रामीण समुदायाचे शोषण होऊ शकते असे गांधीजींना वाटत असे. याच बरोबर स्वदेशी उपक्रमात अनावश्यक, स्वास्थ्यास हानिकारक, व्यर्थ आणि पर्यावरण बिघडवणाऱ्या वाहतूक-वहनास सुद्धा टाळले होते. स्वदेशी हा सर्वव्यापी शांतीचा मार्ग होता, ज्यामध्ये व्यक्ती, लोक व निसर्ग यांचा समावेश होता. जागतिक अर्थव्यवस्था आता लोकांना भौतिक विकासासाठी उच्च कामगिरी, उच्च प्राप्ती आणि उच्च महत्वकांक्षेकडे घेऊन जाते. याचा परिणाम अनेक बाजूने नुकसान कारक ठरतो, त्यातून शांततेचा भंग होते आणि कुटुंबातील संबंध आणि आध्यात्मिक जीवनास बाधा पोहोचते. गांधीजींनी हे जाणले होते की, प्राचीन काळात भारत हा केवळ समृद्धच नव्हता तर तत्त्वज्ञान आणि आध्यात्मिक विकासासही अनुकूल होता.

सद्यस्थितीत जागतिक अर्थव्यवस्थेमुळे स्वदेशी ला फार मोठे आव्हान उभे राहिलेले आहे. परंतु आजही देशांतर्गत लहान लहान उद्योगांनी तयार केलेल्या वस्तू व सेवांचा वापर देशात वाढीस लागला तर त्यातून उत्पादन, रोजगार यात वाढ होऊन अर्थव्यवस्था बळकट होण्यास व परावलंबित्व कमी होण्याच्या दृष्टीने स्वदेशीचा विचार महत्त्वपूर्ण आहे.

### ७. विश्वस्थाची संकल्पना

गांधीजींची विश्वस्थाची संकल्पना ही ना भांडवली व्यवस्थे प्रमाणे होती, ना संपत्ती धारकांना तिचा दुरुपयोग करण्यास मान्यता देणारी होती. यानुसार विश्वस्त व्यक्ती फक्त त्याच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या उत्पन्नाचा मालक असावा असे सरकारकडून निश्चित केले जावे अशी धारणा होती. गांधीजीची आर्थिक सुव्यवस्था शोषण रोखणारी होती आणि व्यक्तीला स्वयंपूर्ण तसेच अहिंसेवर विश्वास असणारा व श्रमप्रतिष्ठा मानणारा सभ्य माणूस बनविणारी होती. महात्मा गांधी हे अशा मताचे होते की, श्रीमंत लोकांनी जमवलेल्या अतिरिक्त संपत्तीचे वितरण हे समाजाच्या कल्याणासाठी झाले पाहिजे. संपत्ती ही खऱ्या अर्थाने संपूर्ण समाजाच्या मालकीची असते. श्रीमंत लोकांनी स्वतःला विश्वस्थ समजावे, त्यांची संपत्ती अधिग्रहण करण्याचा कोणताही दबाव त्यांच्यावर आणला जाणार नाही. तसेच त्यांच्या संपत्तीचा योग्य वापर हा एक विश्वस्त म्हणून त्यांच्या परवानगीनेच केला गेला पाहिजे.

भारतात सध्या असलेली उत्पन्न व संपत्तीची विषमता, मोजक्या लोकांच्या हातातील अमाप संपत्तीचे केंद्रीकरण, त्यातून होणारे शोषण या समस्यांचा विचार करता महात्मा गांधींची विश्वस्थाची संकल्पना अतिशय समर्पक असल्याचे स्पष्ट होते.

### ८. सर्वोदय

सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय किंवा कल्याण होय. महात्मा गांधींच्या आर्थिक व्यवस्थेमध्ये मानवाच्या विकासाचे अंतिम ध्येय गाठण्यासाठीचे दोन टप्पे होते. एक म्हणजे, राजकीय स्वातंत्र्य आणि आणि दुसरे म्हणजे, ग्रामीण आणि

कुटीर उद्योगाच्या आधारे प्रत्येक कुटुंबाला किमान उत्पन्न पातळीची हमी देऊन आर्थिक स्वयंपूर्ण बनवणे. विकासाच्या पहिल्या टप्प्यात स्वराज्य हे राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक सुरक्षिततेची खात्री देईल. दुसऱ्या टप्प्यात लोकांना चांगले जीवनमान मिळेल, विकासाची सर्वांना समान संधी मिळेल व सर्वांचा उदय होईल.

\जयप्रकाश नारायण सर्वोदयाबद्दल लिहितात, " आम्ही असा समाज निर्माण करू इच्छितो जिथे शोषणाचा अभाव असेल, प्रत्येक व्यक्तीला पूर्ण समानतेची वागणूक दिली जाईल व विकासाची समान संधी असेल." पुढे ते म्हणतात, सर्वोदयाचे उद्दिष्ट हे एक वर्गरहित, जातरहित व शोषणरहित समाजाचे आहे. सर्वोदयाची संकल्पना ही स्वप्नाळू किंवा आदर्शवादी नसून ती व्यावहारिक आहे; तिचा प्रत्यक्ष अंमल करता येऊ शकतो. प्रत्येक व्यक्तीसाठी मित्रता, आदर, सहानुभूती हा सर्वोदयाचा मार्ग आहे. जो सत्य आणि अहिंसेवर आधारलेला आहे. सामाजिक न्याय, समानता व नवीन सामाजिक संरचना हे सर्वोदयातील महत्वाचे दृष्टिकोन आहेत.

विनोबा भावे यांच्या सूत्रानुसार, विज्ञान + अहिंसा = सर्वोदय (Science + Non-Violence = Sarvodaya) विनोबांचे हे समीकरण विचारात घेतले तर आधुनिक काळातील सर्वोदयाची समर्पकता किंवा गरज स्पष्ट होते.

### ९. विकास आणि अभिवृद्धी

गांधी विचारांवर आधारित विकासाची संकल्पना ही अतिशय व्यापक होती. ज्यामध्ये केवळ आर्थिक विकास नाही तर सामाजिक आणि मानवी विकासही समाविष्ट होता. मानवी कल्याण याशिवाय आर्थिक वृद्धी म्हणजे विकास नाही असे गांधीजींचे मत होते. गांधीजींच्या विकासाचे सूत्र पुढील प्रमाणे सांगता येईल. विकास = आर्थिक अभिवृद्धी + सर्वोदय (Development = Economic Growth + Sarvodaya). गांधीजी या मताचे होते की, मानवी संसाधने ही विकासाचे नियोजन आणि धोरणांचा केंद्रबिंदू असली पाहिजेत. ते म्हणतात, " मला मनापासून विश्वास आहे की, एखादे धोरण हे फक्त कच्च्या मालाचा उपयोग करते आणि सशक्त मानवी संसाधन यांना दुर्लक्षित करते तेव्हा तो केवळ एक अपव्यय होय. अशा धोरणामुळे मानवी समानता प्रस्थापित होऊ शकत नाही." (I heartily believe that any such policy which uses only raw materials and ignores powerful human resources is merely a waste and human equality can't be established in such manner.") महात्मा गांधींची विकासाची संकल्पना ही देशातील सर्व लोकांच्या मूलभूत गरजांच्या तरतुदी वर आधारित होती. जोपर्यंत दारिद्र्य आणि बेरोजगारी पूर्णतः काढून टाकली जात नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने समृद्ध किंवा स्वातंत्र्य प्राप्त झाले असे म्हणता येत नाही, असे त्यांना वाटत असे. जेव्हा देशातील नागरिकांना त्यांच्या गरजांची पूर्तता करण्याइतपत उत्पन्न मिळते तेव्हा तो देश समृद्ध आहे असे म्हणता येते. ("A country can be called prosperous and free only when its citizen can easily earn enough to meet their need.") गांधीजींच्या विकास कार्यक्रमात तीन टप्पे समाविष्ट होते. एक म्हणजे ग्रामीण भागात खादी आणि हस्तकला उद्योगातून विकास करणे, त्यातून खेड्यांना स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी बनविणे. दुसऱ्या टप्प्यात स्वराज्याच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला आर्थिक संधी देऊन विकास साधने तसेच विकेंद्रीकरणाच्या द्वारे ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेतील दरी कमी करणे. शेवटी 'सर्वोदय' या संकल्पनेतून सर्वांना संधीची समानता देऊन वर्गरहित, जातरहित, व शोषणरहित समाजाची निर्मिती करणे.

महात्मा गांधीजींचे विकासाचे प्रारूप हे सर्व समावेशी समतोल विकासाचे तत्व पाळणारे असल्यामुळे ते सध्याच्या काळासाठी एक आवश्यक ठरू शकते.

**१०. अर्थव्यवस्थेचे स्वरूप व राज्याची भूमिका**

गांधी विचारातील अर्थव्यवस्था ही शुद्ध भांडवलशाही किंवा पूर्णतः समाजवादी अर्थव्यवस्था नव्हती तर ती एक नवीन अशी मिश्र अर्थव्यवस्था होती ज्या अर्थव्यवस्थेला 'व्यावहारिक अर्थव्यवस्था' (Pragmatic Economy) किंवा श्रमप्रधान अर्थव्यवस्था (Labour Oriented Economy) असे नाव देता येईल. याबाबत गांधीजी म्हणतात, "माझ्या व्यवस्थेत अंतर्गत श्रम हे धातू नाही तर प्रचलित नाणे असेल." ("Under my system it is labour which the current coin, not metal is.") गांधीजी श्रमप्रतिष्ठा हे तत्त्व मानणारे होते त्यामुळे रोजगाराला अर्थव्यवस्थेत त्यांनी अनन्यसाधारण स्थान दिल्याचे आढळते.

महात्मा गांधी हे सत्तेच्या केंद्रीकरणाच्या विरोधात होते, कारण त्यामुळे अहिंसा धोक्यात येते असे त्यांचे मत होते. त्यांचा लोकशाही तत्वावर भर होता. त्यामुळे गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे अहिंसा आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित लोकशाही सरकार जिथे मनुष्य हा सर्वोच्च स्थानी आणि राज्य किंवा सरकार हे केवळ सेवक असेल. याला गांधीजींनी 'राम राज्य' असे म्हटले आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, सर्वांना समान संधी देणारी लोकप्रणित किंवा समाज प्रणित अर्थव्यवस्था असावी जिथे सरकारची भूमिका ही किमान असेल असे गांधीजींना वाटतसे. गांधीजींचे अर्थव्यवस्था व सरकारच्या भूमिकेबाबत असलेले विचार लोकांच्या सामाजिक व आर्थिक कल्याणाच्या दृष्टीने अतिशय समर्पक असल्याचे स्पष्ट होते.

**११. श्रमप्रतिष्ठा**

महात्मा गांधी हे श्रमप्रतिष्ठा या तत्वाला मानणारे विचारवंत होते. ते कुठल्याही श्रमाला कमी प्रतीचे समजत नसत. श्रम हीच ईश्वर पूजा आहे, असे त्यांचे म्हणणे होते. प्रत्येकाने श्रम घेतल्यास देशाची प्रगती होऊ शकते तसेच व्यक्तीचे आरोग्यही चांगले राहते. याशिवाय श्रम करणे हा एक निसर्गनियम असून त्याचे पालन करण्यातच आपले हित असते. श्रमामध्येच जीवनाचा आनंद दडलेला आहे. कोणत्याही कामाला कमी न लेखता ते करत गेल्यास त्यातून व्यक्तीला समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते, असे गांधीजी म्हणत असत. सध्या भारतात प्रचुर प्रमाणात श्रम उपलब्ध आहेत. या आधारेच ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी भारताला जागतिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न पाहिले होते. म्हणून श्रम पुरवठ्याचा उचित वापर झाला व श्रमाला प्रतिष्ठा मिळाली तर देशाचा वेगाने विकास करता येईल. जपान सारख्या देशाने श्रमप्रतिष्ठेच्या जोरावर खूप प्रगती केल्याचे उदाहरण आपल्या समोर आहेत. यावरून गांधीजींनी सांगितलेले श्रमप्रतिष्ठेचे तत्व समर्पक सिद्ध होते.

## समारोप

महात्मा गांधींचे आर्थिक विचार हे सत्य, अहिंसा, अपरिग्रह तसेच नीतीशास्त्रावर आधारित आहेत. ज्यांच्या आधारे एक आदर्श समाज व न्याय्य अर्थव्यवस्था उदयास येऊ शकेल. वर्तमानकालीन जागतिक अर्थव्यवस्थेत गांधीजींच्या विचारांची अंमलबजावणी करणे जरी कठीण काम असले तरी या विचारांतून अनेक सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करता येईल. आज मोठ्या प्रमाणात होऊ घातलेले शहरीकरण अनेक समस्यांचे मूळ ठरत आहे. अशावेळी 'खेड्यांकडे चला' असे म्हणणारे महात्मा गांधी अधिक समर्पक विचारांचे वाटतात. भारताचा विकास आजही ग्रामीण विकासाच्या अभावी थांबल्याचे जाणवते. उत्पन्न व संपत्तीच्या वितरणात मोठ्या प्रमाणात विषमता निर्माण झाली आहे. प्रादेशिक विषमता वाढत चालली आहे. त्यातून विकासातील समतोल बिघडला आहे. अशा अनेक प्रश्नांचे उत्तर गांधीजींच्या विचारात सापडते. यामुळे गांधीजींचे आर्थिक विचार हे काल, आज आणि एवढेच नाही तर उद्यासाठी देखील उपयुक्त आणि समर्पक आहेत हे स्पष्ट होते.

## संदर्भ सूची


१. Gupta Shanti Swarup, Economic Philosophy of Mahatma Gandhi, Concept Publishing Company, New Delhi (1994) P.No. 136,137,185.
२. Patel Asha, Gandhian Vision of Rural Development, Decent Book, New Delhi (2005).
३. Ghosh B. N., Gandhian Political Economics: Principles, Practice and Policy, Ashgate Publishing Limited, England (2006).
४. Maind Suresh, Economic Ideas of Mahatma Gandhi - Issues and Challenges, Articles: On and By Gandhi (2019).
५. Shikhare G. S., Gandhian Economic Order in the new Millennium, Articles: On and By Gandhi (2019).
६. Nandela Krishna, The Relevance of Gandhian Economics to Modern India, Articles: On and By Gandhi (2019).
७. Kumarappa J. C., Gandhian Economic Thought, Published by Sarva Seva Sangh Prakashan, Rajghat, Varanasi (1951).
८. प्रकाश आंबेडकर, आजच्या संदर्भात गांधी समजून घेताना, गांधी नव्याने समजून घेऊ या!, मराठा संस्कृती साहित्य मंडळ आणि हरिती पब्लिकेशन्स, पुणे (2018).